**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५ )**

**बुधवार दिनांक २४ जून २०२६**

**ठळक बातम्या….**

1. **घरकुल योजनेच्या हप्त्याचे पैसे कोणत्याही परिस्थितीत थांबणार नाहीत; ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांची विधानसभेत ग्वाही**

2. **नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील तक्रारींची चौकशी करण्याचं वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांचं आश्वासन**

3. **गडचिरोली जिल्ह्याच्या तीन प्रगतशील शेतकऱ्यांना 'वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार' जाहीर**

4. **आज नागपूर, अमरावती, यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्यात मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट**

---

**जयकुमार गोरे**

राज्यातील प्रत्येक नागरिकाला हक्काचे घर मिळावे यासाठी शासन कटिबद्ध असून घरकुल योजनेच्या हप्त्यांचे पैसे कोणत्याही परिस्थितीत थांबणार नाहीत, अशी ग्वाही ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी विधानसभेत दिली. पुढील एका वर्षात राज्यात १५ लाख घरे बांधण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून आतापर्यंत ६ लाख ५ हजार ५९६ घरे पूर्ण झाली आहेत. घरकुल योजनेसाठी २०२६-२७ मध्ये १३ हजार ९४७ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून तांत्रिक अडचणी दूर झाल्यानंतर हप्ते वितरणाची प्रक्रिया सुरळीत सुरू असल्याच त्यांनी सांगितल. जमीन उपलब्ध नसलेल्या लाभार्थ्यांना जागा खरेदीसाठी एक लाख रुपयांपर्यंत आर्थिक मदत देण्यात येणार असल्याचही त्यांनी स्पष्ट केल.

---

**नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय**

कोट्यवधी रुपयांचा निधी मिळूनही नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील अपुऱ्या सुविधा, रखडलेली विकासकामे आणि रुग्णांना भेडसावणाऱ्या समस्यांचा मुद्दा काँग्रेस आमदार विकास ठाकरे यांनी आज राज्य

विधिमंडळाच्या अधिवेशनात उपस्थित केला. मिळालेल्या निधीचा उपयोग कसा केला जातो याविषयी ऑडिट करण्याची मागणी त्यांनी केली -

***(होल्ड बाईट- काँग्रेस आमदार विकास ठाकरे - ३१ सेकंद)***

याशिवाय डॉक्टर, परिचारिका आणि कर्मचाऱ्यांची रिक्त पदे, औषधांचा तुटवडा, बंद पडलेली वैद्यकीय उपकरणे, तपासण्यांसाठी होणारा विलंब तसेच स्वच्छता आणि मूलभूत सुविधांच्या अभावाबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली. यावर नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील निधीच्या वापराबाबत करण्यात आलेल्या तक्रारींची चौकशी करून योग्य ती कारवाई केली जाईल, अशी ग्वाही वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली. तसेच नेत्ररोग विभागाची विद्यमान इमारत असुरक्षित किंवा जीर्ण असल्याचे स्ट्रक्चरल ऑडिटमध्ये आढळल्यास नवीन नेत्र रुग्णालयाची इमारत उभारण्यात येणार असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं . तक्रारींच्या चौकशीसाठी २३ जून २०२६ रोजी समिती नियुक्त करण्यात आली असून तिला एका महिन्यात अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. चांगली कामगिरी करणाऱ्या डॉक्टरांना आवश्यक सुरक्षा पुरविण्याची जबाबदारी विभाग घेईल, असेही मंत्री मुश्रीफ यांनी सांगितल.

---------------------------------------

**डॉ. नितीन राऊत**

कोराडी औष्णिक वीज केंद्र आणि वेकोलिच्या खाणींमधून होणाऱ्या फ्लाय ॲश प्रदूषणामुळे उत्तर नागपूरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याचा मुद्दा काँग्रेस आमदार डॉ. नितीन राऊत यांनी विधानसभेत उपस्थित केला. बेझनबाग, नारा, नारी, इंदोरा, मानकापूर, गोधनी आणि उप्पलवाडीसह अनेक भागांमध्ये उडत्या राखेमुळे श्वसनविकार आणि दम्याच्या रुग्णांमध्ये वाढ होत असल्याचा दावा त्यांनी केला. प्रदूषणग्रस्त भागात विशेष आरोग्य शिबिरे आयोजित करण्यासह प्रभावी उपाययोजना आणि बाधित नागरिकांना नुकसानभरपाई देण्याची मागणी त्यांनी केली. यासंदर्भातील विनंती अर्ज विधानसभेत मांडण्यात आला असून तो विनंती अर्ज समितीकडे पाठविण्यात आला आहे.

---------------------------------------

**नो युवर डॉक्टर**

राज्यातील नागरिकांना नोंदणीकृत डॉक्टरांची माहिती सहज मिळावी यासाठी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडून ‘नो युवर डॉक्टर’ ही क्यूआर कोड आधारित प्रणाली सुरू करण्यात आली असल्याची माहिती वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी विधानसभेत दिली. क्यूआर कोड स्कॅन करून संबंधित डॉक्टर नोंदणीकृत आहे की

नाही, याची तात्काळ माहिती मिळणार आहे. राज्यात सध्या सुमारे १ लाख ४० हजार नोंदणीकृत डॉक्टर कार्यरत असून २०१५ ते २०२६ या कालावधीत बोगस डॉक्टरांविरोधात ८९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अनधिकृत वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांवर एक वर्षाच्या कारावासापासून ५० लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद असल्याचही मंत्री मुश्रीफ यांनी स्पष्ट केल. ऐकुया आजच्या विधिमंडळ कामकाजाचा आढावा आमच्या प्रतिनिधींकडून -

*(राज्यात बाल विवाहाचं प्रमाण कमी करण्यासाठी लग्न पत्रिकेत वर आणि वधूची जन्मतारीख नमूद करण्यासाठी विधी आणि न्याय तसेच ग्रामविकास विभागांच्या मदतीने कार्यवाही करण्याचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती महिला बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी विधानसभेत दिली. राजस्थानमध्ये बालविवाह रोखण्यासाठी ही पद्धत सुरू आहे. राज्यातले बालविवाहाचे प्रमाण १० टक्क्यांच्या आत आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. ज्या जिल्ह्यात हे प्रमाण जास्त आहे तिथे विशेष मोहीम राबवण्यात येत असल्याचं त्यांनी सांगितलं. गेल्या वर्षी राज्यात सुमारे पंधराशे आणि चालू वर्षात आतापर्यंत चौदशेहून अधिक बालविवाह रोखण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. परभणी, बीड, धुळे, सोलापूर जिल्ह्यात बाल विवाहाचे प्रमाण ४० टक्क्यांपेक्षा जास्त असल्याची माहिती सरकारने लेखी उत्तरात दिली.गेल्या आर्थिक वर्षात राज्यात ५ वर्षाखालील १२ हजार ७२९ बालकांचा आणि गेल्या ३ वर्षात ४० हजार ५५९ बालकांचा मृत्यू झाला. मुदतपूर्व जन्म, जंतू संसर्ग, न्यूमोनिया वगैरे कारणांमुळे हे मृत्यू झाले आहेत. हे प्रमाण कमी करण्यासाठी सरकारकडून विविध उपाययोजना सुरू असल्याची माहिती सरकारने विधानसभेत लेखी उत्तरात दिली आहे. दरम्यान, गेल्या ३ वर्षापासून राज्यातल्या कुपोषित बालकांचं प्रमाण कमी होत असल्याची माहिती सरकारने दिली आहे. राज्याच्या काही भागांमध्ये मान्सूनला सुरुवात झाली असली तरी शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असा सल्ला राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिला आहे. विधानसभेत एका चर्चेला उत्तर देताना भरणे म्हणाले की, शेतकऱ्यांनी प्रथम आपल्या शेतातली ओलाव्याची पातळी तपासून, पुरेसा ओलावा असल्याची खात्री झाल्यावरच पेरणी करावी. एल निनोसह हवामानातल्या इतर अनिश्चिततेचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांना कृषी विभाग मदत करेल असं आश्वासनही भरणे यांनी दिलं. दरम्यान, पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी शोक प्रस्ताव वाचताना झालेल्या चुकांबद्दल विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे. छापील भाषणाची प्रत अस्पष्ट होती, त्यात काही चुका होत्या त्यामुळे वाचताना चूक झाल्याचं ते म्हणाले. कोणाच्याही भावना दुखावण्याचा उद्देशाने नव्हे तर चुकून हे झाल्याचं त्यांनी मान्य केलं. इतरांच्या इतकाच मराठी भाषेचा अभिमान आहे आणि यापूर्वी अनेक भाषणं*

*मराठीत केली आहे याकडे त्यांनी सभागृहाचं लक्ष वेधलं.तत्पूर्वी राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत झालेल्या अनियमिततेच्या निषेधार्थ विरोधी पक्ष सदस्यांनी विधान भवन परिसरात निदर्शनं केली.)*

**आकाशवाणीसाठी वृत्त विभागातून मी धैर्यशील मेश्राम**

---------------------------------------

**शेतकरी पुरस्कार**

महाराष्ट्र शासनाने सन २०२३ आणि २०२४चे राज्यस्तरीय कृषी पुरस्कार काल जाहीर केले. गडचिरोली जिल्ह्यातील तीन प्रगतशील शेतकऱ्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत राज्य शासनाने त्यांना प्रतिष्ठेचा 'वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार' जाहीर केला आहे.सन २०२३-२४ साठीचा वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार सर्वसाधारण गटातून आरमोरी तालुक्यातील शंकरनगर येथील शेतकरी विष्णूपद गाईन, तर आदिवासी गटातून एटापल्ली तालुक्यातील वडसाकला येथील दयाराम सिडाम यांना जाहीर झाला आहे. सन २०२४-२५ च्या पुरस्कारासाठी सर्वसाधारण गटातून आरमोरी तालुक्यातील कोरेगाव(रांगी) येथील शेतकरी पुरुषोत्तम जांभूळकर यांची निवड करण्यात आली आहे.४४ हजार रुपयांचा धनादेश, स्मृतीचिन्ह, प्रशस्तिपत्र असं या पुरस्काराचं स्वरुप आहे. १ जुलै रोजी मुंबई इथं आयोजित कार्यक्रमात राज्यपालांच्या हस्ते पुरस्कारप्राप्त शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

---------------------------------------

**राष्ट्रीय एससी**

भारत सरकारच्या MSME मंत्रालयांतर्गत राष्ट्रीय एससी-एसटी हब आणि बीईएसीआयच्या संयुक्त विद्यमाने नागपुरात उद्योजक जागरूकता आणि विशेष विक्रेता विकास कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं . या कार्यक्रमात सुमारे २०० नवोदित आणि विद्यमान उद्योजक सहभागी झाले. शासकीय खरेदी प्रक्रियेत एससी-एसटी उद्योजकांचा सहभाग वाढविणे आणि विविध योजनांची माहिती देणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. यावेळी राष्ट्रीय एससी-एसटी हबचे प्रभारी महेंद्र मालवीय यांनी हबच्या विविध उपक्रमांची माहिती देताना एससी/एसटी मालकीच्या सूक्ष्म आणि लघुउद्योगांकडून केंद्रीय मंत्रालये, विभाग आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांनी किमान ४ टक्के खरेदी करणे बंधनकारक करणाऱ्या सार्वजनिक खरेदी धोरणाचं महत्त्व अधोरेखित केलं.

---------------------------------------

**आयपीएस प्रशिक्षण**

अग्निसुरक्षा आणि आपत्कालीन व्यवस्थापन क्षेत्रातील वाढत्या आव्हानांना समर्थपणे सामोरे जाण्यासाठी आयपीएस अधिकाऱ्यांनी अग्निशमन सेवा व्यवस्थापन, अग्नी चाचणी आणि प्रमाणन तसेच अग्नी न्यायवैद्यक तपासणी या विषयांचं सखोल ज्ञान आत्मसात करण आवश्यक असल्याचं प्रतिपादन अग्निशमन सेवा, नागरी संरक्षण आणि होमगार्ड्सचे महासंचालक सुनील कुमार झा यांनी केलं. नागपुरातील राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालयात आयोजित आयपीएस प्रोबेशनर अधिकाऱ्यांच्या ओरिएंटेशन कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी आज ते बोलत होते. हैदराबाद येथील सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पोलीस अकादमी येथे प्रशिक्षण घेत असलेल्या ७८ व्या नियमित भरती तुकडीतील १६४ आयपीएस प्रोबेशनर अधिकाऱ्यांसाठी दोन दिवसीय ओरिएंटेशन कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे.

---------------------------------------

**विशेष सखोल पुनरीक्षण**

चंद्रपूर जिल्ह्यात विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेंतर्गत ८६.५६ टक्के मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वसुमना पंत यांनी दिली. जिल्ह्यातील १७ लाख ९७ हजार ६५५ मतदारांपैकी १५ लाख ५६ हजार ६४ मतदारांची पडताळणी पूर्ण झाली असून उर्वरित मतदारांचे मॅपिंग सुरू आहे. बूथस्तरीय अधिकारी घरभेटी घेऊन पडताळणी करणार असून नागरिकांनी आवश्यक माहिती देऊन या प्रक्रियेस सहकार्य करण्याचं आवाहन पंत यांनी केलं आहे.

---------------------------------------

**हवामान**

आज नागपूर, अमरावती, यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्यात मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. चंद्रपूर जिल्ह्यात उद्याही मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. याशिवाय उर्वरित जिल्ह्यांमध्ये देखील वादळी पर्जन्यमानासह हलक्या पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे . काल झालेल्या पर्जन्यवृष्टीत भंडारा जिल्ह्यात साकोली इथं 84 मिलिमीटर तर अमरावती जिल्ह्यात नांदगावखंडेश्वर इथं ८२ पूर्णांक ४ मिलिमीटर पावसाची नोंद करण्यात आली

---------------------------------------